

# लोक खोटे का बोलतात?

## (ब्लॉग परिचय)

‘लोक खोटे का बोलतात? खोट्या गोष्टींवर विश्वास का ठेवतात? त्या गोष्टी ते का पसरवतात?’ हा प्रश्न अनेक वेळा आपले डोके पोखरत राहिलेला आहे. बिल गेट्स आणि युवाल नोआ हरारी या जगप्रसिद्ध लोकांना याच विषयावर चर्चा करताना ऐकायलाही मजा येईल. बिल गेट्स यांच्या ‘Gates Notes: The Blog of Bill Gates’ या ब्लॉगवरच्या ४ वर्षांपूर्वीच्या ३ऱ्या एपिसोडमधील काही निवडक मजकुराचे भाषांतर केले आहे नीलिमा सहस्रबुध्दे यांनी.

**तुम्ही विश्वास ठेवता अशी एखादी खोटी कल्पना आहे का?**

- कोणत्याही अडचणी सोडवायच्या असतील तर इनोव्हेशन किंवा नवीन संशोधन हाच उपाय आहे. ‘आपण पुरेसे कष्ट केले, योग्य तसे तल्लख हुशार लोक शोधले आणि त्यांना संशोधन करायला संसाधने पुरवली तर कुठलीही समस्या आपण सोडवू शकतो!’ ही खरी तर फार फार सोपी केलेली मांडणी आहे. पण माझी दिशा साधारण हीच आहे. :-

**बिल गेट्स**

- मनात आशा जागी ठेवण्यासाठी माझा असा विश्वास आहे, की माणसे मुळात चांगलीच असतात आणि अधिकारी माणसे ही माझ्यापेक्षा सक्षम असतात. हे तितकेसे खरे नाही असे अनेकदा लक्षात आले, तरी तशी श्रद्धा ठेवणे मला आवश्यक वाटते. :-

**रशिदा जोन्स**

युवाल नोआ हरारी यांच्या 'सेपियन्स' या पुस्तकामध्ये असे म्हटले आहे, की माणूस ही एकच प्रजात 'न दिसणाऱ्या गोष्टींवर' विश्वास ठेवते. उदा. धर्म, राष्ट्र, तत्त्वज्ञान, सरकार, संस्था... यांना काही मूर्त स्वरूप नसते; मात्र या संकल्पना - रचना गृहीत धरून त्याभोवती माणसाला समाजरचना करता येते, संशोधन करता येते, पायाभूत सुविधा निर्माण करता येतात. ते कधी भले ठरते, कधी बुरे.



**मग माणूस हा खोटे बोलणारा प्राणी आहे, असे समजायचे का?** तर तसे नाही...

युवाल नोआ हरारी यांनी या चर्चेदरम्यान अशी मांडणी केली आहे -

माणसे अनेक कल्पना करत असतात, गोष्टी सांगत असतात. त्यांचा त्यावर विश्वास असतो. त्या गोष्टी काही मुद्दाम फसवण्यासाठी रचलेल्या नसतात. इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा मानवी समाज एकत्रपणे काम करतो, कारण ते अशा काही कल्पित अमूर्त गोष्टी गृहीत धरून वागू शकतात. बरेचसे कल्पित साहित्य निर्माण होते, एकमेकांना सांगितले जाते, ते सांगणाऱ्या माणसांचा त्यावर विश्वास असतो. त्या कधी छोट्याशा कथा असतील किंवा कधी मोठ्या... धार्मिक, आर्थिक क्षेत्रातले सिद्धांत, वांशिक मांडणी इ.




या उलट, खोटे बोलणे म्हणजे बोलणाऱ्याचा त्यावर विश्वास नसतो, त्याला ते स्पष्ट माहीत असूनसुद्धा तो तसे सांगत असतो. कल्पित साहित्य पसरते तेव्हा त्यावर सांगणाऱ्याची श्रद्धा असते. ‘आपण स्वतःला फसवतो आहोत, का दुसऱ्याला’ हे समजणेसुद्धा कठीणच असते. कधीकधी दुसऱ्याला फसवायला जाताना माणसे त्या प्रवासात स्वतःच त्या कल्पनेवर विश्वास ठेवायला लागतात.

**आजच्या काळात या कल्पित साहित्याचा धोका वाढला आहे काय?**

माणसे नेहमी सत्ता असणाऱ्या माणसांच्या मागून जातात, वेगवेगळया प्रकारची सत्ता. त्यामुळे आजची परिस्थिती पूर्वीपेक्षा वेगळी आहे. दगडधोंडे वापरणाऱ्या माणसांनी पसरवलेल्या खोट्या श्रद्धांपेक्षा अणुबॉम्बधारक माणसांच्या खोट्या श्रद्धांचा धोका नक्कीच प्रचंड वाढतो.

एक लक्षात घ्यायला हवे, माहिती आणि सत्य यात फरक आहे. त्यात आपला गोंधळ असतो. उदा. कट कारस्थानाची रचलेली कहाणी ही एक प्रकारची माहितीच म्हणायला हवी. ते सत्य नव्हे. पण माहितीचा प्रसार करण्याचे प्रत्येक नवे साधन किंवा तंत्र हे खोटे- कल्पित- कट कारस्थानाच्या कथा देखील पसरवण्याचे साधन असतेच. युरोपात जेव्हा नव्याने पुस्तके छापण्याची सुरुवात झाली, तेव्हा वैज्ञानिक क्रांतीचे परिणाम युरोपभर दिसू लागले, असे म्हटले जाते. आपल्या डोळयांपुढे, लोक न्यूटन आणि कोपर्निकस; त्यांचे शोध याबद्दल वाचायला लागले अशी चित्रे उभी राहतात. पण त्या काळातले एक बेस्ट सेलर होते ‘द हॅमर ऑफ द विचेस’ - काळी जादू करणाऱ्या बायांना कसे शोधावे आणि ठार मारावे याबद्दलचे

पुस्तक! चेटकीण समजून ठार मारण्याच्या सर्वात जास्त घटना मध्ययुगापेक्षा जास्त सोळा सतराव्या शतकात, विज्ञान युगाच्या सुरुवातीला घडल्या... कारण ही पुस्तके, आणि 'छापलेले आहे, म्हणजे ते सत्य असणार' अशी श्रद्धा!




स्रोत : https://www.readandcobooks.co.uk/books/malleus-maleficarum-hammer-of-witches-kramer/

**माणसाला खरोखर सत्य समजून घेण्यात रस असतो, का कुणीतरी काहीतरी सत्य आहे असे नुसते सांगितले तरी पुरते?**

'सत्य' या शब्दाची आपली व्याख्या करायला हवी. सत्य दोन प्रकारचे असते.

एक असते बाह्य जगाबद्दलचे.

समजा कुणाला शिकार करायची आहे, किंवा कुणाला अणुबॉम्ब बनवायचा आहे... तर इथे त्याबद्दलची वस्तुस्थितीच अभ्यास करून जाणून घ्यावी लागेल. कल्पित कथेने काम होणार नाही.

दुसरे असते मानवी दुनियेचे ज्ञान.

इथल्या कथा मानवी समाजावर ताबा मिळवतात. या कथा समाजात पायाभूत असतात. धर्म, विचारधारा अशा कल्पितांसाठी ते सत्यच असण्याची गरज नसते. बहुसंख्य लोकांची एकसारखीच श्रद्धा असेल, तर त्या समाजावर ती श्रद्धा मानणाऱ्या, वापरणाऱ्या लोकांची सत्ता चालते. बहुधा इथे सत्य हे अडचणीचेच ठरते. हे लक्षात घ्यायला हवे, की ती

श्रद्धा वस्तुस्थितीवर, सत्यावरच आधारलेली नसेल, तरी ती परिणामकारक असू शकते! एखाद्या कल्पितावर जेव्हा पुष्कळशा लोकांची श्रद्धा असेल, तेव्हा त्याच्या आधाराने समाजावर प्रचंड सत्ता मिळवता येते.

पुष्कळशा लोकांची श्रद्धा ज्या कल्पितांवर असते, ती सगळी सरळ सोपी असतात. 'सत्य' हे समजून घ्यायला सोपे कधीच नसते. ही दुनिया फार गुंतागुंतीची आहे. 'माणसांना खरोखर सत्य हवे असते का' याचा विचार करताना हे समजून घ्यायला हवे, की 'सत्य जाणून घेणे ही दुःख देणारी, वेदना देणारी गोष्ट असते'. दुसऱ्याबद्दलचे सत्य सोपे असेल कदाचित, पण स्वतःबद्दलचे सत्य स्वीकारायला कठीण असते. शिवाय ते अतिशय गुंतागुंतीचे असते.

उदा. विषाणू म्हणजे काय, त्यामुळे साथ कशी येते? यामागे एक संभाव्यतेचे गणित




आहे. यातील सत्य झटकन सांगून संपत नाही. आपले मन- मेंदू आळशी असतो. तो फक्त समाजातले नातेसंबंध जाणून घ्यायला उत्क्रांत झालेला आहे. कारण कळपात टिकून राहण्यासाठी ते अत्यावश्यक होते. विषाणूबद्दलचे सत्य संपूर्ण तपशीलात नाही समजले, तरी चालते. पण आपल्याला विरोधी कोण वागेल, हे माहीत हवे. विषाणू कुणीतरी पसरवतो आहे, अशी कथा समजायला किती सोपी. शिवाय ती आपल्याला माहीत आहे, म्हणजे आपण स्मार्ट आहोत ही भावना चांगली असते. विषाणू आपल्याला नीट समजत नाही, म्हणजे आपण मूर्ख आहोत ही भावना नकोशी आहे. म्हणून माणूस सोपी सरळ उत्तरे शोधत असतो (ती कल्पित असली तरी).

कायदे, नियम जाणून घेणे आणि धर्मविचार समजून घेणे याची तुलना करून बघा. धर्म एवढा आकर्षक का असतो याचे उत्तर मिळेल. आपला देश, त्यातले प्रश्न, आपले बजेट, त्यातली योग्यअयोग्यता याबद्दल माणूस विचार का करत नाही, त्याचे कारण इथे आहे.

....

मंडळी, इथपर्यंत अर्धा एपिसोड संपतो. यापुढेही सत्य म्हणजे काही आहे की नाही, महागाई कशात धरायची... सत्य की कल्पित, AI मुळे काय घडेल, माणसाचे खरे शत्रू... या बद्दल चर्चा आहे.

शेवटी हरारी यांनी मांडले आहे, 'इतिहासकार म्हणून मला वाटते की आपण माणसाच्या मूर्खपणाने वागण्याच्या क्षमतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही! मानवजातीला सर्वात मोठा धोका आहे तो मूर्खपणाने वागण्याचा!!'

हा मूळ ब्लॉग जरूर ऐका, पुन्हा पुन्हा देखील ऐका.

मूळ ब्लॉग : https://www.gatesnotes.com/Why-do-we-believe-lies

§§§

---

**भाषांतर** : **नीलिमा सहस्रबुद्धे, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.**

**इ-मेल :** neelimasahasrabuddhe@gmail.com

*(कळीचे शब्द :- बिल गेट्स, युवाल नोवा हरारी, सेपियन्स, सत्य म्हणजे काय, कल्पित गोष्टी, श्रद्धा, Bill Gates, Yuval Noa Harari, Sapiens)*

## शैक्षणिक संदर्भ अंक १५० नंतर.......

प्रिय वाचक,

जून महिन्यात आम्ही आपल्याला काही प्रश्न विचारले होते,

शैक्षणिक संदर्भच्या स्वरूपाबद्दल, दर आठवड्याला आम्ही पाठवत असलेल्या लेखाबद्दल, आम्हाला पडत असलेले हे प्रश्न होते. त्यावर आलेल्या प्रतिसादावर विचार करून आम्ही थोडे बदल करावेत असे ठरवले आहे.

अंक १५० नंतरचा आपला संवाद थोड्या वेगळ्या रूपात असेल.

काही वेळा नवे लेख, कधी ऑडियो, कधी व्हिडियो, कधी नव्या-जुन्या लेखांचा परिचय व त्यांची लिंक; तर कधी कथावाचन, लेखवाचन या रूपात आम्ही तुमच्याशी संवाद साधत राहू.

आपल्या प्रतिसादाची वाट पाहू.

धन्यवाद,

शैक्षणिक संदर्भ टीम